ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Govt. College of Arts & Science, Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कोरोना : भारतातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती आणि स्थलांतर<br>**प्रा. अंकुश झेड. गायकवाड** | १-७ |
| २ | महाविद्यालयीन मुलींच्या शारिरीक क्षमतेवर सुर्यनमस्काराचा परिणाम<br>**डॉ. आशा संजय देशमुख**<br>**प्रा. देवीसिंग फकीरा राठोड**<br>**प्रा. शहाजी उत्तमराव चव्हाण** | ८-१२ |
| ३ | दलित कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान: जग बदलण्याचे हत्यार<br>**डॉ. शिवाजी विश्वनाथ डोळसे** | १३-२० |
| ४ | भौगोलिक दृष्टीकोनातून कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर लोकसंख्या स्थलांतर : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. कल्पना देशमुख** | २१-२६ |
| ५ | दलित कवितेतील विद्रोह<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | २७-२९ |
| ६ | 'बौद्ध आणि मूल्य शिक्षण' (बोद्ध च अग्घ सिक्खनं)<br>**प्रा. डॉ. भिक्खू एम. सत्यपाल** | ३०-३३ |
| ७ | कोविड-१९: पारंपरिक शिक्षणपद्धतीवर परिणाम<br>**डॉ. नीता र. तोरणे** | ३४-३९ |
| ८ | कोरोनामुळे भारतातील सामाजिक व आर्थिक जीवनावरील परिणाम : एक अभ्यास<br>**डॉ. बी. आर. शिंदे**<br>**डॉ. आर. एम. मूगावे** | ४०-४६ |
| ९ | समाजव्यवस्थेवर झालेले दूरगामी परिणाम : एक अभ्यास<br>**डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर** | ४७-४९ |
| १० | मराठी दलित कवितेचा इतिहास<br>**प्रा. डॉ. संगीता दोंदे** | ५०-५५ |
| ११ | जागतिक शांतता आणि बुद्ध धम्म<br>**शिवानंद सुखदेव साळवे** | ५६-५८ |
| १२ | बीड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय एक भौगोलिक अभ्यास<br>**डॉ. घुगे एस. पी.** | ५९-६४ |




Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १. कोरोना : भारतातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती आणि स्थलांतर

**प्रा. अंकुश झेड. गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

## प्रस्तावना

मानवाच्या ज्ञात इतिहासात अशा रोगांच्या साथी बऱ्याचदा येऊन गेल्या आहेत.ज्यामुळे संपूर्ण मानव जातीवर संकट ओढवले होते. अगदी ख्रिस्तपूर्व काळात साथीच्या रोगामुळे आखे देश नेस्तनाबूत झाल्याचे पुरावे आढळतात. तिसऱ्या व सहाव्या शतकात वेगवेगळ्या प्रकारच्या प्लेग मुळे लाखो बळी गेले होते. अकराव्या शतकात संपूर्ण युरोपभर कुष्ठरोगाची साथ आली होती.आजही जगभरात कुष्ठरोगाचे रुग्ण आढळतात. इ.स.१३५० साली आलेल्या प्लेग मुळे तर पृथ्वीवरचे १/३ (एक तृतीयांश) लोक मरण पावले होते. तर सन १६६५ साली आलेल्या प्लेग मुळे लंडनमध्ये २०% लोकांचा जीव गेला होता.

१८ व्या शतकाच्या सुरुवातीपासून सुमारे दीडशे वर्षांमध्ये जगभरात कॉलराची साथ (७) सात वेळा आली होती. रशिया, आफ्रिका,चीन,जपान आणि इंडोनेशियासह अनेक ठिकाणी लाखो लोक मरण पावले होते. याच दरम्यान ब्रिटिश सैनिक भारतात आले तेव्हा हा रोग सोबत घेऊन आले त्यामुळे १८९६-९७ च्या आसपास भारतात कॉलराची भयंकर साथ आली होती. गेल्या दोनशे वर्षात कांजण्या,रशियन फ्ल्यू,स्पॅनिश फ्ल्यू,एसिअन फ्ल्यू अशा अनेक रोगांनी एकाच वेळी जगभरात लाखो लोकांचे जीव घेतले,परंतू त्यावेळी जागतिक आरोग्य संघटने(WHO) सारखी संस्था अस्तित्वात नसल्यामुळे अशा रोगांची अचूक नोंद ठेवण्यात आली नव्हती.

अलीकडे अनेक साथीचे रोग जगभरामध्ये येऊन गेलेले दिसतात. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर अगदी अलीकडे म्हणजे २००३ मध्ये 'सार्स' हा साथ पसरवणारा विषाणू निर्माण झाला होता ( सार्स (SARS) : सिव्हीयर अक्युट रिस्पेरेटरी सिन्ड्रोम). हा आजार मांजर या प्राण्याशी संबंधित होता असा निष्कर्ष त्यावेळी काढण्यात आला होता. तसेच २०१३ साली मध्यपूर्वेत 'मर्स' हा साथ पसरवणारा विषाणू निर्माण झाला होता. (मर्स (MARS) : मिडल इस्ट रिस्पेरेटरी सिन्ड्रोम) हा आजार उंट या प्राण्यापासून मानवात संक्रमित झाला होता असा अनुमान त्यावेळी काढण्यात आला होता. त्याबरोबरच इबोला, स्वाईन फ्ल्यू,बर्ड फ्लू अशा प्रकारचे विषाणूजन्य साथीचे रोग प्राणी ,पक्षी या पासून होणारे रोग भारतामध्ये आले होते यामुळे मानवाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान ही झालेले आहे. हे सर्व रोग प्राण्यांकडून पक्षांकडून मानवामध्ये आल्याचे सांगितले जाते अशाच प्रकारचा २०१९ मध्ये एक साथीचा रोग निर्माण झाला आहे त्यास 'कोरोना' किंवा कोविड-१९ असे म्हटले जाते. सध्या या विषाणू जन्य आजाराने संपूर्ण जगात धुमाकूळ घातला आहे.

## कोविड-१९ विषयीची माहिती

कोरोना हे विषाणूच्या एका समूहाचे नाव आहे. जे प्राण्यांमध्ये सामान्यतः आढळून येतात. कधी कधी लोकांना प्राण्यांच्या अथवा त्यांच्या मासांच्या निकट संपर्क केल्यामुळे या विषाणूची लागण होते. जे नंतर संसर्गामुळे इतर लोकांमध्ये पसरू शकते. याची ऐतिहासिक पार्श्वभूमी अशी की, डिसेंबर २०१९ मध्ये जेव्हा कांही अनिश्चित कारणामुळे



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

उद्भवलेल्या निमोनियाचे रुग्ण चीनच्या हुबेई प्रांतातील वुहान शहरातील रुग्णालयात दाखल झाले. हे रुग्ण वूहानच्या 'सिफूड व वेट ऍनिमल' या होलसेल मार्केटशी संबंधित होते. प्रारंभी तपासणीत त्यांना कोरोणाचा संसर्ग झाल्याची शक्यता वर्तविण्यात आली. नंतर हा कोरोनाविषाणू असल्याची पुष्टी करण्यात आली. चीनच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी ३१ डिसेंबर २०१९ रोजी वुहान शहरात संक्रामक कोरोना व्हायरस आढळल्याची पुष्टी केली. नंतर ३० जानेवारी २०२० रोजी जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यू.एच.ओ) या विषाणूचा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्य विषयक आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे जाहीर केले. नंतर ११ फेब्रुवारी २०२० ला डब्ल्यू. एच.ओ.ने नव्या मानवी कोरोना विषाणू आजार २०१९ चे कोव्हिड-१९ असे नामकरण केले. पुढे ११ मार्च २०२० रोजी सदरचा आजार हा जागतिक महामारी असल्याचे जाहीर करण्यात आले. **(एखादी साथ ही एका देशाबाहेर किंवा खंडाबाहेर पसरते आणि जगभरात एकाच वेळी ठिकठिकाणी या रोगाची स्वतंत्रपणे लक्षणे दिसतात तेव्हा त्यास पेंड्यामिक (Pandemic) जागतिक साथीचा आजार असे म्हणतात).** अल्पावधीतच हा विषाणू संपूर्ण जगभरातील जवळजवळ १९५ देशामध्ये पसरलेला आहे. या आजाराने जगातील लाखो लोक संक्रमित झाले असून हजारो लोकांचा बळी या आजाराने घेतला आहे. संपुर्ण जग या आजाराने हैराण झाले असून जगातील सकल संशोधन संस्था यावर औषध /लस शोधून काढण्याच्या कामात व्यस्त आहेत. सध्या तरी कोणतीही प्रभावी लस/ औषध या विषाणूवर निघालेले नाही.

### भारतातील कोरोना विषाणूची परिस्थिती

भारतात कोरोना विषाणूचा पहिला रुग्ण २९ जानेवारी २०२० रोजी भारतातील केरळ या राज्यांमध्ये आढळला. आणि त्यानंतर तो हळूहळू शेजारच्या राज्यांमध्ये पसरत गेला किंवा त्यांचा संसर्ग होत गेला.कोरोना हे एका विषाणू समूहाचे नाव आहे. हे विषाणू भारताला पूर्वीपासून माहिती आहेत २००३ मध्ये आढळलेला सार्स किंवा २०१३ मध्ये आढळलेला मर्स हे सुद्धा कोरोना विषाणू मुळे होणारे आजार आहेत. परंतु डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुबेई प्रांतातील वुहान शहरात सुरू झालेल्या संसर्गजन्य विषाणू पेक्षा हा कोरोना विषाणू वेगळा आहे. म्हणून त्यास नोवेल(Novel) अर्थात,नवीन कोरोना विषाणू असे संबोधण्यात येते.जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) या आजारास कोव्हिड-१९ असे नाव दिलेले आहे.

या आजाराने संपूर्ण देशात १०७७६१८ बाधित रुग्ण संख्या आहे तर यातील २६८१६ रुग्णाचा आतापर्यंत मृत्यू झाला आहे तर ६७७४२३ रुग्ण यातून बरे झाले आहेत.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाची परिस्थिती लक्षात घेता या साथीच्या रोगास प्रतिबंध करण्यासाठी सुरवातीला केंद्र स्तरावरून अनेक प्रयत्न केले गेले.सर्व प्रथम २२ मार्च २०२० रोजी मा.पंतप्रधानांनी संपूर्ण देशात एक दिवसाचा 'जनता कर्फ्यू ' पाळण्याचे आवाहन नागरीकांना केले होते.कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बरेच कर्तव्य दक्ष लोक अहोरात्र आपल्या जीवाची पर्वा न करता सेवा देत आहेत. या लोकांप्रति सामाजिक कृतज्ञता म्हणून टाळ्या,थाळ्या,शंख इ.आपल्या घरातून किंवा ग्यालरीतून वाजवून या सर्व लोकांचे आभार व्यक्त करायला सांगितले होते. नंतर २४ मार्च २०२० च्या रात्री ८ च्या सुमारास देशाला संबोधित करतांना २१ दिवसांच्या (१४ एप्रिल पर्यंत) संचारबंदी ची घोषणा पंतप्रधानांनी केली होती.आणि याच दिवशीच्या रात्री १२.०० पासून संपूर्ण लॉकडाऊन ची घोषणा केली.नंतरच्या काळात या लॉकडाऊनची मुदत दिवसेंदिवस वाढत गेली.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

आकडेवारीनुसार भारतातील एकूण रुग्णांपैकी एकट्या महाराष्ट्रात ३००९३७ बाधित रुग्ण असून एकूण मृत्यू पैकी ११५९६ मृत्यू राज्यात झालेले आहेत. तर बरे झालेल्या रुग्णाची संख्या १६५६६३ इतकी आहे.

या रोगावरील उपाय योजनेचा भाग म्हणून अभूतपूर्व निर्णय घेण्यात आले आहेत. संपूर्ण लॉकडाऊन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ११ मार्च २०२० पासून राज्यातील प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व बससेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आल्या आहेत. १३ मार्च २०२० रोजी महाराष्ट्र शासनाने कोरोणा विषाणूचा उद्रेक पाहता महाराष्ट्रात 'महामारी रोग अधिनियम १८९७' लागू करण्यात आला. राज्यात जमावबंदीचे कलम १४४ लागू करण्यात आले. २२ मार्च २०२० पासून प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय विमानसेवा, रेल्वे तसेच मुंबईतील लोकल रेल्वे सेवा बंद करण्यात आली.२३ मार्च २०२० रोजी राज्यात जमावबंदीने फरक पडत नसल्याचे पाहून संपूर्ण राज्यात संचारबंदी लागू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. याबरोबरच राज्याच्या सर्व सीमा बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. राज्यातील सर्व जिल्ह्यांच्याही सीमा सील करून एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात वाहतूक करण्यास मनाई करण्यात आली. सर्व धर्मियांची प्रार्थनास्थळे बंद करण्यात आली. देशातील विमानतळ बंद करण्याचा संबंधित अधिकार पंतप्रधानांना असल्याने सर्व विमानतळ त्वरित बंद करण्याची विनंती मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांकडे केली आणि याचाच परिणाम २४ मार्च च्या मध्यरात्रीपासून देशांतर्गत वाहतूक करणारी विमानसेवा ही बंद करण्यात आली.

खरेतर महाराष्ट्रातील जनजीवनावर त्याचे फार मोठे विपरीत परिणाम झाले. राज्यात लागू झालेल्या नियमानुसार अत्यावश्यक कामाशिवाय सर्वांना घरी बसणे सक्तीचे करण्यात आले. नागरिकांची उपासमार होऊ नये, अन्नधान्याचा तुटवडा भासू नये म्हणून रेशन दुकानावर तीन महिन्यांचे राशन देण्याचा निर्णय झाला. जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी जनतेला दिलेली सूट लोकांच्या बेशिस्तीच्या वागण्याने समाजासाठी प्राणघातक ठरू नये, यासाठी पोलीस यंत्रणा झगडत आहे. वैद्यकीय यंत्रणा जीवावर उदार होऊन रात्रंदिवस सेवा करण्यात व्यस्त आहेत. या विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी लोकांनी घराबाहेर पडू नये, दोन व्यक्तीमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे असे स्पष्ट निर्देश प्रशासनाने वारंवार करूनही लोक गांभीर्याने घेताना दिसत नाहीत. मूलभूत अधिकारासोबत नागरिकांनी आपल्या मूलभूत कर्तव्या बाबतही जागरूक असायला हवे असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वरळे यांनी व्यक्त केले.

**कोविड-१९ विषयीची माहिती : कोरोनाचे मूळ स्थान**

कोरोना हा प्राणी जगतातून मानवाकडे आलेला विषाणू आहे. तो मुख्यत्वे वटवाघुळ या मध्ये आढळतो. बेसुमार जंगलतोड, वाढते शहरीकरण, कच्चे मांस खाण्याची सवय इत्यादी कारणामुळे प्राणी जगतातील सूक्ष्मजीव मानवामध्ये प्रवेश करतात. आणि हा आजार साथीचा असल्यामुळे एकाकडून दुसऱ्याला पसरत जातो यालाच साथीचा रोग असे म्हणतात.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**रोगाची लक्षणे**

या आजाराची लक्षणे श्वसन संस्थेशी निगडित असतात. सर्वसाधारणपणे या आजाराची लक्षणे इन्फ्ल्यूंझा सारखीच असतात. सर्दी,कोरडा खोकला,श्वास घेण्यास त्रास, घसा खवखवणे किंवा अतिसार ही लक्षणे सौम्य असतात.

काही रुग्णांना कोणतेही लक्षणे नसताना ही ते बाधित आढळले आहेत. काही बाधित रुग्णांना कोणतेही उपचार न घेता शारीरिक रोग प्रतिकार क्षमतेमुळे आजार बरा झालेली उदाहरणे आहेत.

### आजाराचा प्रादुर्भाव कसा होतो

हा आजार व्यक्तीच्या खोकल्यातून, शिंकण्यातून जे थेंब बाहेर पडतात त्यातून पसरतो. शिवाय हे उडालेले थेंब आजूबाजूच्या पृष्ठभागावर पडतात. अशा पृष्ठभागाला स्पर्श केल्याने ते हाताला चिकटतात आणि हाताने वारंवार चेहरा, डोळे, नाक याला स्पर्श करण्याच्या सवयीमुळे देखील संक्रमण होऊ शकते किंवा बाधित रुग्णाच्या संपर्कात ज्यास्त काळ आल्यास संक्रमण होण्याचा धोका असतो. खरेतर आतापर्यंत कोरोनाविषाणू आजारावर कोणतेही औषध,लस उपलब्ध नाही.रुग्णांना त्याच्या लक्षणांनुसार उपचार केले जातात आणि रुग्ण बारा होतो.ज्या रुग्णांना अगोदरच कांही व्याधी असतील तर त्यावर उपचार करणे कठीण जाते आणि उपचारा दरम्यान असे रुग्ण दगावण्याची शक्यता जास्त असते.

### काय काळजी घ्यावी

कोरोना किंवा श्वसनावाटे पसरणाऱ्या स्वाइन फ्लू ,क्षयरोग असे आजार टाळण्यासाठी खालील खबरदारी घेणे आरोग्यासाठी हिताचे आहे.

१. श्वसन संस्थेचे विकार असणाऱ्या व्यक्तीशी संपर्क ठेवताना संसर्ग नहोण्याची काळजी घेणे
२. वारंवार हात धुऊन स्वच्छ करणे (साबण लाऊन पाण्याने स्वच्छ करणे २० सेकंद )
३. शिंकताना किंवा खोकलताना नाका-तोंडावर रुमाल अथवा टिशू पेपर धरणे.
४. कच्चे व अर्धवट शिजवलेले अन्नपदार्थ खाऊ नये.
५. फळे, भाज्या पाण्याने स्वच्छ धुऊन घ्यावे.
६. सामाजिक अंतर कमीत कमी एक मीटर म्हणजे (तीन फूट) अंतर पाळणे आवश्यक आहे.
७. बाहेर सार्वजनिक ठिकाणी जाताना तोंडाला मास्क लावून जाणे आवश्यक आहे.
८. स्वतःचे रक्षण करण्यासाठी मांस विक्रीच्या बाजारात जाताना प्राणी आणि त्यांच्या मासाच्या संपर्कात असलेल्या पृष्ठभागाशी थेट संपर्क टाळा.

### आजाराचा अधिशयन कालावधी

अधिशयन कालावधी म्हणजे विषाणूचा शरीरामध्ये प्रवेश झाल्यापासून ते आजाराची लक्षणे दिसण्यापर्यंतचा काळ.' हा कालावधी आजपर्यंतच्या अभ्यासावरून साधारणपणे १ ते१४ दिवसाचा असतो तथा सर्वसाधारणपणे पाच दिवसाचा असतो. हा विषाणू एखाद्या वस्तूवर, पृष्ठभागावर किती काळ टिकतो हे निश्चित नाही परंतु आतापर्यंतच्या अभ्यासानुसार कोरोनाविषाणू कांही तास किंवा एक दिवस पृष्ठभागावर टिकून राहू शकतात. हे परिस्थितीनुसार भिन्न असू शकते. उदा. पृष्ठभागाचा प्रकार, वातावरणाचे तापमान आणि आर्द्रता यावर अवलंबून असते, एखादा भाग संक्रमित झाला आहे असे वाटल्यास विषाणू नष्ट करण्यासाठी आणि स्वतःचे व इतरांचे संरक्षण करण्यासाठी साध्या जंतुनाशकाणे तो भाग साफ करा नंतर आपले हात साबण आणि पाणी वापरून स्वच्छ धुवा, आपले डोळे,तोंड किंवा नाकास स्पर्श करणे टाळा.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**विलगीकरण आणि उपचार व्यवस्था**

संशयित किंवा आजारी रुग्णांना भरती करण्यासाठी सध्या मुंबई मध्ये कस्तुरबा रुग्णालय आणि पुण्यात नायडू रुग्णालय येथे आवश्यक विलगीकरण व उपचार सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. शिवाय प्रत्येक जिल्हा रुग्णालयात आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ही विलगीकरण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. विलगीकरण कक्षासाठी खाजगी रुग्णालयात समन्वय ठेवण्यात येत आहे.

**प्रयोगशाळा निदान व्यवस्था**

सध्या राज्यात तीन प्रयोगशाळांमध्ये नवीन कोरोनाविषाणू निदानाची व्यवस्था करण्यात आली आहे.

१. राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे.

२. कस्तुरबा मध्यवर्ती प्रयोगशाळा, मुंबई.

३. इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर.

४. इतर जिल्ह्याच्या ठिकाणी

**सारांश**

एकंदरीत उपर्युक्त परिस्थितीचा आढावा घेऊन भारतासारख्या विकसनशील देशांनी कोरोनाशी लढताना आपापल्या देशातील आर्थिक, सामाजिक परिस्थितीचा अंदाज घेत त्यानुरूप धोरणात्मक आराखडे तयार करणे हितावह आहे. जगातील सर्वच राष्ट्रांनी एकच पर्याय स्वीकारला तो म्हणजे लॉकडाउन. हा पर्याय स्वीकारण्या अगोदर प्रत्येक देशांनी आपल्या देशातील सामाजिक ,आर्थिक परिस्थिती कशी आहे याचा अंदाज घेऊनच अर्थव्यवस्थेची घडी नीट बसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लॉकडॉउन हा एकच पर्याय स्वीकारल्यामुळे राज्यावर तद्वतच समाजावर त्याचे गंभीर परीणाम होण्याची दाट शक्यता असते. या काळात लोकांना काम करण्यापासून रोखणे ही बाब लोकांच्या आरोग्याच्या व पर्यायाने सामाजिक संतुलनाच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकेल. तसेच सर्वच बाजारपेठा बंद केल्याने अन्न पुरवठा करण्यात अडथळे निर्माण होतात.यातून लोकांच्या उदरनिर्वाहाची भीषण समस्या निर्माण होऊ शकते.कांही अर्थतज्ज्ञाच्या मते, महामारीमुळे निर्माण झालेली परिस्थिती योग्य हाताळली नाही तर विकसनशील देशात उपासमारीचा धोका उदभऊ शकतो.

टाळेबंदीची सर्वात ज्यास्त झळ शेती क्षेत्रालाही बसलेली आहे. शेतीवर, शेत मजूरावर, छोटे उधोगधंदे जसे कुकुट पालन,मासळी पालन,मेंढीपालन,तसेच दुग्ध उत्पादक शेतकऱ्यावर ही याचे खूप मोठे परीणाम झाले आहेत. शिवाय मासेमारी क्षेत्रावरही याचे भयंकर परिणाम बघायला मिळतात.या क्षेत्राचा अर्थव्यवस्थेत खूप मोलाचा वाटा आहे. एकूण लोकसंख्येच्या १.४० लाख लोकांचा उदरनिर्वाह यावर अवलंबून आहे. टाळेबंदीची परिस्थिती अशीच सुरु राहिली तर या सर्व लोकावर उपासमारीची वेळ आल्याशिवाय राहणार नाही.म्हणून लॉक डाऊन करण्या अगोदर याचे तुलनात्मक अध्यायन होणे आवश्यक आहे.

या परिस्थितीची सर्वाधिक झळ अदिवशी जनतेला बसलेली आहे. वनोत्पादना बरोबर तेंदू पत्ते गोळा करणे,मोहाची फूले गोळा करणे ही आणि अशा स्वरुपाची कामे करून ते लोक आपला उदरनिर्वाह करतात. टाळेबंदीमुळे दळणवळण व्यवस्था बंद, बाजारपेठा बंद आहेत याचा फार मोठा फटका यांना बसला आहे. ही परिस्थिती अशीच राहिली



Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

तर लोकांची उपासमार सुरु होईल. जेवढे लोक कोरोना या विषाणूची लागण होऊन मारणार नाहीत त्यापेक्षा कितीतरी अधिक लोक उपासमारीने मरतील अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

साधारणतः या सर्व परिस्थितीचा सर्वात ज्यास्त परिणाम असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या मजूर लोकांना बसणार आहे. ज्यांचे पोट रोजच्या मजूरीवर अवलंबून आहे.

जोपर्यंत या विषाणूवर लस/औषध उपलब्ध होत नाही किंवा सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात सोई सुविधा उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत लोकसंख्येच्या बहुसंख्य गटाला नसला तरी समाजातील मोठ्या वर्गाला याची बाधा होऊ शकते यात शंका नाही.

म्हणून राज्य सरकार असो वा केंद्र सरकार असो टाळेबंदीचा विचार करण्याअगोदर उपर्युक्त परिस्थितीचे तुलनात्मक अवलोकन करूनच निर्णय घ्यावा असे कांही तज्ञाचे मत आहे.

**संदर्भ**

१. सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन- कोविड-१९ वरील माहिती पुस्तिका २०२०
२. मराठी विकिपीडिया : मुक्त ज्ञान कोषामधील प्रसिद्ध लेख :५ एप्रिल २०२०
३. द वायर :मराठी मध्ये प्रसिद्ध लेख -२९ मार्च २०२०.
४. ORF: Observer Research Foundation- मराठी मधील प्रसिद्ध लेख –
५. ORF: Observer Research Foundation- मराठी मधील प्रसिद्ध लेख –
६. कोरोना मुळे ग्रामीण अर्थव्यवस्था संकटात.
७. BBC News : मराठी प्रतिनिधी लेख -२४ एप्रिल २०२०.
८. मासिक : संचारबंदी : राज्या बरोबर जिल्ह्याच्या सीमा सील -१० एप्रिल २०२०
९. वृत्तपत्रा त प्रसिद्ध लेख: लालपरी ही शांत बसणार -१० एप्रिल २०२०.
१०. दैनिक वृत्तपत्र,मासिके,आणि सामाजिक माध्यमावरील माहिती संग्रह २०२०.
११. इतर प्रसार माध्यमावरील संग्रहित माहिती २०२०.



Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad